२१ था बैठकीत बंद

(171) close

तक्रार क्र. ३५/२२ (12)
अ.क्र. १२

# मिरा भाईंदर महानगरपालिका

प्रभाग कार्यालय क्र.01
शुभम आर्केड, दुसरा मजला, मिरा हॉस्पीटलच्या शेजारी, डि मार्ट परिसर,
भाईंदर (प.) ता.जि.ठाणे 401 101 दुरध्वनी क्रं.28140002

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/प्र.का.क्र.1/अति ९२७/२१/ २६७७/२०२२-२३ दिनांक :- ०९/०२/2023

प्रति,
सहा. आयुक्त (पर्यावरण)
मिरा भाईंदर महानगरपालिका

विषय :- श्री. अमजद खान - मौजे भाईंदर (प.) ता.जि.ठाणे येथील जागेवर कांदळवनाची कत्तल. (तक्रार क्र.171)

संदर्भ :- 1) आपलेकडील जा.क्र.मनपा/पर्यावरण/कांदळवन/110/2022-23 दि.24/01/2023 रोजीचे पत्र.
2) इकडील जा.क्र.मनपा/प्र.का.क्र.1/6990/2021-22 दि.25/03/2022 रोजीचे मा. उपायुक्त सो. (पर्यावरण) यांना दिलेले पत्र.
3) वसुंधरा संर्वधन ट्रस्ट यांचे दि.10/01/2022 रोजीचे पत्र.

आवक क्र. ५२
दि. १३/०२/०२३
पर्यावरण विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, अर्जदार श्री. अमजद खान, व्य. संचालक वसुधरा संवर्धन ट्रस्ट यांचे संदर्भिय पत्र या कार्यालयात प्राप्त झालेला आहे. सदर पत्राच्या अनुषंगाने मौजे भाईंदर, सर्व्हे क्र.566, 565, 567 जुना 218, 219, 220, 267 नविन या जागेवर कांदळवनापासुन 50 मिटर परिसरात कांदळवनाची बेसुमार कत्तल व भरणी करून त्यावर सुदामा ग्रुप या विकासकामार्फत सुदाम वल्लभ सिंपली डिवाईन या इमारतीचे बांधकाम सुरू करून व संकुलामध्ये खेळाचे मैदान (TURF) तयार करून कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेड चे उल्लंघन केले असलेबाबत संदर्भिय पत्रान्वये कळविण्यात आलेले आहे.

तरी सदर ठिकाणी यापुर्वी असलेले तत्कालीन कनिष्ठ अभियंता यांनी मौजे भाईंदर, सर्व्हे क्र.566, 565, 567 जुना 218, 219, 220, 267 नविन या जागेवर प्रत्यक्ष स्थळ पाहणी करून सदर ठिकाणी बांधकामाचे विकासक श्री. प्रविण व्होरा व त्याचे सल्लांगार अभियंता मे.बी.ए.सी. प्लॅनर्स ॲण्ड इंजिनियर यांना नगररचना विभागामार्फत पत्र क्र.मिभा/मनपा/नर/771/2022-21 दि.10/09/2020 अन्वये नकाशे मंजुरीसी बांधकाम परवानगी दिलेले आहे. तसेच पत्र क्र.मिभा/मनपा/नर/3655/2021-22 दि.01/02/2022 अन्व्ये देण्यात आलेल्या इरादा पत्रात मौजे भाईंदर, स.क्र.568 (जुना) 218 (नविन) सदरचा गृहप्रकल्प सी.आर.झेड इको सेन्सीटीव्ह झोन किंवा पाणथळ मध्ये सामाविष्ट नसुन सदर जागेमध्ये उच्च दाबाची

उप वनसंरक्षक ... मुंबई
आवक 83
दिनांक 25/07/23
Mangrove Comm.
Anita Patil



D:\atikram vibhag\Atikraman Vibhag 2022-23\MBMC Letter 2022 23.docx

वाहिनी अस्तित्वात नसल्याचे म्हटले आहे. याबाबत संदर्भ क्र.02 अन्वये मा. उपायुक्त सो. (पर्यावरण) यांना कळविण्यात आले असुन सदर पत्राची छायाप्रत सोबत जोडुन देत आहे. तसेच प्रत्यक्ष स्थळ पाहणी केली असता सदर जागेवर कोणत्याही प्रकारचे क्रिकेट टर्फचे बांधकाम निदर्शनास आलेले नाही.

9.2.2023.

(कांचन गायकवाड)
सहा. आयुक्त
तथा पदनिर्देशित अधिकारी
प्रभाग समिती कार्यालय क्र.1
मिरा भाईंदर महानगरपालिका

Thane - complaint No. 171

महाराष्ट्र शासन

अपर तहसिलदार व कार्यकारी दंडाधिकारी, मिरा-भाईंदर यांचे कार्यालय

पत्रव्यवहाराचा पत्ता : प.पु.डॉ.केशव बळीराम हेगडेवार भवन इमारत, पहिला माळा, मॅक्सस मॉलच्या मागे, अमृतवाणी रोड, भाईंदर (प)- ४०११०१. तालुका-ठाणे, जिल्हा- ठाणे.
दुरध्वी क्र. ०२२-२८१८५११६ ईमेल आयडी-tahmirabhayander@gmail.com

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

क्र.महसूल/कांदळवन/तक्रार क्र. १७१ दिनांक : ०१/०३/२०२३

प्रति,

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

(महसूल शाखा)

विषय :- राज्य कांदळवन संरक्षण व संवर्धन सनियंत्रण समितीकडे प्राप्त तक्रार क्र.१७१ बाबत.
श्री. अमजद खान यांचा तक्रारी अर्ज.

महोदय,

उपरोक्त विषयाचे अनुषंगाने सादर करणेत येते, की मा. उच्च न्यायालय मुंबई यांनी रिट याचिका क्रमांक ३२४६/२००४ मध्ये दिनांक ०६/१०/२००५ रोजी दिलेला निर्णय व त्यातील रुपांतरीत जनहित याचिका क्रमांक ८७/२००६ मध्ये दिनांक २७/०१/२०१० रोजी दिलेल्या निर्णयाच्या अनुषंगाने श्री. अमजद खान यांनी कांदळवनाच्या / पाणथळाच्या -हासाबाबत दिलेल्या तक्रारीच्या अनुषंगाने सखोल चौकशी करुन, केलेल्या कार्यवाहीचा सविस्तर अहवाल पुढीलप्रमाणे सादर करीत आहोत.

**कांदळवन तक्रारीचा पुर्तता अहवाल**

| अ.क्र. | तक्रारीचा तपशील | कार्यवाहीचा तपशील |
|---|---|---|
| १ | तक्रारदाराचे नाव व दिनांक | श्री. अमजद खान |
| २ | तक्रारीचा विषय | मौजे भाईदर ता. जि. ठाणे जु.स.क्र.५६५, ५६६, ५६७ नवीन स.क्र.२१८, २१९, २२०, २६७ या जागेवर कांदळवनाची कत्तल व भरणी करुन, त्यावर सुदामा ग्रुप या विकासकामार्फत सुदाम वल्लभ सिंपली डिवाईन या इमारतीचे बांधकाम सुरु करुन व संकुलामध्येच खेळाचे मैदान TURF) तयार करुन कांदळवनाचा ऱ्हास व सीआरझेडचे उल्लंघन केलेबाबत |
| ३ | तक्रारीशी संबंधीत जागेचा तपशील उदा. स.क्र. गावाचे नाव, तालुका | मौजे भाईदर ता. जि. ठाणे जु.स.क्र.५६५, ५६६, ५६७ नवीन स.क्र.२१८, २१९, २२०, २६७ |
| ४ | चौकशी करणाऱ्या अधिकाऱ्याचे नाव व पदनाम | वन परिक्षेत्र अधिकारी, ठाणे (कांदळवन), मुंबई |
| ५ | चौकशीमध्ये आढळून आलेली वस्तुस्थिती | ➢ दि. ०१/०२/२०२२ रोजी स्थळपाहणी करणेत आली.<br>➢ तक्रारीतील नमुद क्षेत्र अधिसूचित कांदळवन क्षेत्र नाही.<br>➢ सन ३१ डिसेंबर २००५ रोजी MRSAC MAP नूसार कांदळवन दिसून येत नाही.<br>➢ खाजगी कांदळवन क्षेत्र आहे. |

उप वनसंरक्षक कांदळवन कक्ष, मुंबई
आवक क्रमांक 569
दिनांक 06/03/2023
मुख्य लेखापाल उप वनसंरक्षक

| | | |
|---|---|---|
| | | ➢ सद्यस्थितीत जागेवर कांदळवन आहे.<br>➢ या ठिकाणी जागेवर भरणी करुन इमारत बांधण्याचे काम चालू असल्याचे दिसून आले. तसेच या इमारतीच्या एका कोपऱ्यात पाण्याच्या टाकी शेजारी मेसवक या कांदळवन सहयोगी प्रजाती दिसून आली. सदरचे झाड हे एक ते दीड फूट उंचीचे असून, या जागेचे GPS वाचनाचे २००५ सालच्या छायाचित्रांचे अवलोकन केले असता या जागी शेतजमीन असल्याचे दिसून आले. |
| ६ | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे किंवा नाही. | कांदळवनाचा ऱ्हास झाला आहे |
| ७ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास दाखल केलेला गुन्हा क्रमांक, दिनांक व संबंधीत पोलीस स्थानकांचे नाव | मंडळ अधिकारी, भाईंदर यांना प्रस्तुत प्रकरणी संबंधीतांवर पर्यावरण संरक्षण अधिनियम १९८६ मधील कलम १५ व १९ नूसार गुन्हा दाखल करणेबाबत दिनांक ०१/०३/२०२३ रोजीचे पत्रान्वये कळविणेत आले आहे. |
| ८ | कांदळवनाचा ऱ्हास झाला असल्यास, ज्याच्याविरुध्द गुन्हा दाखल केला आहे त्या व्यक्तींची नावे व पत्ता | नाही. |
| ९ | कोणत्या कायद्याअंतर्गत/कलमाअंतर्गत गुन्हा दाखल केला त्यांचे वर्णन | नाही. |

सदर तक्रारीच्या अनुषंगाने वरील प्रमाणे कार्यवाही करण्यात आली असून, सोबत पंचनामा व एफ.आय.आर. च्या प्रतीसह पृष्ट क्रमांक १ ते --- सादर केलेली आहेत.

(सौ. स्मिता गुरव)
नायब तहसिलदार, मिरा-भाईंदर

टिप :- स्थळ प्रतीवर मा. अपर तहसिलदार, मिरा-भाईंदर यांची स्वाक्षरी असे.